MHLA050006602018

विशेष दिवाणी दावा क्र. १३/२०१८

## <u>आदेश नि.क्र. ६५ वर</u>

प्रतिवादीकडून मुळ नोंदणीकृत ईच्छापत्र क्र. २७६४/२०१८ मागवण्यात यावे म्हणून वादीने हा अर्ज दिलेला आहे.

२. या अर्जावर प्रतिवादीने म्हणणे देऊन अर्जास तीव्र आक्षेप घेऊन अर्ज नामंजूर करण्याची मागणी केली आहे.

३. दोंन्ही बाजुच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकला. वादीच्या वकिलांचे म्हणणे असे की, वादीचे वडील नागनाथ बिलापट्टे यांनी दिनांक ७-८-२०१८ रोजी वादी व प्रतिवादी यांच्या हक्कामध्ये नोंदणीकृत ईच्छापत्र करून ठेवले होते. त्याचा मुळ दस्त प्रतिवादीच्या ताब्यात आहे. या दाव्यात पुराव्यासाठी ते दाखल असणे आवश्यक आहे. म्हणून प्रतिवादीस मुळ दस्त दाखल करण्याचे निर्देश देण्यात यावे. प्रतिवादीतर्फे म्हणणे असे की सदरचा अर्ज पुरावा गोळा करण्यासाठी दिलेला असल्याने नामंजूर करावा.

४. प्रस्तुत दाव्यात वादीने यादी नि.क्र.४ सोबत ईच्छापत्राची प्रत दाखल केलेली आहे. वादीच्या म्हणण्याप्रमाणे मुळ प्रत प्रतिवादीच्या ताब्यात आहे. प्रतिवादीने दिलेल्या म्हणण्यामध्ये ईच्छापत्राची मुळ प्रत त्याच्या ताब्यात नाही असे स्पष्ट कथन केलेले नाही. त्यामुळे मुळ ईच्छापत्र प्रतिवादीच्या ताब्यात असल्याचे दिसून येते. मुळ ईच्छापत्राचा दस्त या दाव्यात दाखल झाल्यास दोन्ही बाजुंना त्याबाबत पुरावा देण्याची संधी मिळणार आहे व वादाचा

गुणदोषावर निर्णय होणार आहे. म्हणून सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून मी खालील आदेश देतो.

**आदेश**

दिनांक ७–८–२०१८ रोजीचे मुळ नोंदणीकृत ईच्छापत्र क्र. २७६४/२०१८ प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी दाखल करावे.

Digitally signed by PRASAD ANANT SAVADIKAR
Date: 2023.08.07 15:57:23 +0530

**(प्र. अ. सवदीकर)**

दिनांक ०५/८/२०२३.

दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
अहमदपूर.